# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

१ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

Email Id- recruitmentnagpurmunicipalcorp@gmail.com Website- https://nmcnagpur.gov.in


आस्थापना क्र: ६०२

दिनांक : १३/१०/२०२५

## सूचनापत्र - २

**जाहिरात क्र.३९९/पी.आर दि.२२.०८.२०२५ चे अनुषंगाने उत्तरतालिका (Answer key) व हरकत अर्जाबाबत सूचना.**

नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी वर्तमानपत्रात क्र. **क्र.३९९/पी.आर दि.२२.०८.२०२५** प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार अर्ज केलेल्या अर्हताधारक उमेदवारांची ऑनलाईन परिक्षा दिनांक ०७.१०.२०२५ ते ०८.१०.२०२५ पर्यंत घेण्यात आली आहे.

कनिष्ठ लिपीक , लेखापाल/ रोखपाल, डेटा मॅनेजर, ग्रंथालय सहायक ,सिस्टीम अॅनॉलिस्ट, विधी सहायक, कर संग्राहक ,प्रोग्रमर ,स्टेनोग्राफर तसेच हार्डवेअर इंजिनियर या पदांच्या उत्तरतालिकेची लिंक (Answer key) मनपा संकेतस्थळावर (www.nmcnagpur.gov.in) भरती या मेन्यूमध्ये दि.१४.१०.२०२५ ते दिनांक १७.१०.२०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. उमेदवारांनी वरीलप्रमाणे लिंकवर अर्ज क्रमांक (Application no.) व ऑनलाईन अर्ज भरतेवेळी वापरलेला पासवर्ड (Password) वापरुन उत्तरतालिका (Answer key) तपासून घ्यावी तसेच (Objection Form) live करण्यात येत आहे.

कनिष्ठ लिपीक , लेखापाल/ रोखपाल, डेटा मॅनेजर, ग्रंथालय सहायक ,सिस्टीम अॅनॉलिस्ट, विधी सहायक, कर संग्राहक ,प्रोग्रमर ,स्टेनोग्राफर तसेच हार्डवेअर इंजिनियर या पदांच्या ऑनलाईन परिक्षेचे प्रश्न अथवा उत्तराबाबत उमेदवारांच्या हरकती/आक्षेप असल्यास ०३ दिवसांत म्हणजेच दिनांक १७.१०.२०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह उत्तरतालिकेसोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या हरकत अर्जात पाठविण्यात याव्यात. प्रत्येकी एका हरकत/आक्षेपाकरीता रु.२०० शुल्क आकारण्यात येत आहेत. सदरचे शुल्क उमेदवाराने UPI, इंटरनेट बँकींग, क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्डद्वारे भरावे. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती/आक्षेप यांची दखल घेतली जाणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**( मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने )**

**सहा.आयुक्त**
**सामान्य प्रशासन विभाग**
**महानगरपालिका, नागपूर**